# आपत्ती व्यवस्थापन

**डॉ. वैशाली पुंजाराम सूर्यवंशी,**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**विश्वसत्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**ओझर (मिग), ता. निफाड, जि. नाशिक.**

आपत्ती म्हणजे संकट. पर्यावरणीय आपत्ती ही एक विनाशकारी घटना आहे. त्यामुळे प्राणहानी,वित्तहानी तसेच साधनसंपत्तीची हानी होते. पर्यावरणीय आपत्ती मृदावरण, जलावरण, वातावरणात घडून येतात म्हणजेच या आपत्तींना भौगोलिक घटक कारणीभूत असतात. पर्यावरणीय आपत्ती पूर्णपणे थांबविणे मानवाला शक्य नसले तरी या आपत्तीचे नियंत्रण व त्यांच्या पूर्वसूचना मिळविण्यासाठी मानव प्रयत्नशील आहे.

आपत्ती ही सांगून येत नाही. कोणत्याही वेळी अचानक नैसर्गिक वा मनुष्यनिर्मित कारणांनी आपत्ती ओढवू शकते. म्हणून आपत्तीत बचाव व मदतकार्य महत्वाचे ठरते. या मदतकार्यात सूत्रबध्दता हवी तरच खऱ्या अर्थाने सहाय्य करता येईल या दृष्टीने आपत्ती व्यवस्थापनाचा विचार करणे गरजेचे आहे. विकसनशील देशात येणाऱ्या आपत्तीने हानी अधिक होते. विकसित देश आपत्तीला तोंड देण्यासाठी तयार असतात. कारण आपत्ती येण्यापूर्वीची दृष्टी महत्वाची असते. भारत सरकारच्या मिनिस्टरी ऑफ ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंटने दहाव्या पंचवार्षिक योजनेत आपत्ती व्यवस्थापनाचा विचार शिक्षण पध्दतीत केला जावा यावर जोर दिला आहे. युवा पिढीमध्ये आपत्तीपासून बचाव करण्याची दृष्टी यावी. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती ओढवणार नाहीत यासाठी कोणती काळजी घ्यावी हा दृष्टीकोन युवापिढीत निर्माण व्हावा या हेतूने आपत्ती व्यवस्थापनाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

**आपत्ती-**

एकूण समाज जीवनात किंवा कार्यात आपत्ती म्हणजे अत्यंत भयंकर रितीने किंवा झालेली फाटाफूट, विनाश ज्यामुळे समाजातील मनुष्यहानी, वित्तहानी किंवा एकूण पर्यावरणात खूप मोठी हानी होते. ज्याचा समाज जीवनावर मोठा दुष्परिणाम होतो आणि समाज विविध संसाधनांचा नेटका वापर करू शकत नाही.

A serious disruption of the funxtioning of a society cuusing widespread human material or environmental lossess which exceed the ability of the affected society to cope using it own resources.

**आपत्तीची कारणे**

गरिबी अज्ञान

विविध प्रकल्प प्रदुषण

लोकसंख्या वाढ

तापमान वाढ

आपत्ती कारणे

शहरीकरण

पर्यावरण ऱ्हास

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-I June 2013

माहिती ज्ञान कमतरता

१. प्रामुख्याने गरिबी, लोकसंख्येतील भरमसाठ वाढ, ज्ञान व माहितीरं कमतरता (अज्ञान), जलद गतीने होणारी लोकसंख्यावाढ.

२. जलद गतीने होणारे शहरीकरण परिणामी पर्यावरण हास व आपत्तींना आमंत्रण वरील कारणे परस्परावलंबी आहेत. गरिबीमुळे शिक्षणाद अभाव, त्यामुळे अज्ञान, माहितीची कमतरता त्यातून लोकसंख्यावाढ, लोकसंख्या वाढीतून गरिबी वाढत आहे. लोक पोटापाण्याच्या शोधात शहरात येतात. लोकसंख्या वाढल्याने पर्यावरणाचा ऱ्हास, त्यातून तापमान वाढ, जंगलतोड, पाण्याचा अधिक वापर, त्यामुळे अनेक मानवनिर्मित व निसर्गनिर्मित आपत्ती ओढवत आहेत.

३. आपत्ती ओढवण्यास, निसर्गाचा समतोल ढासळण्यास मानव कारणीभूत आहे.

४. नियोजनाचा अभाव ही मानवनिर्मित आपत्ती आहे. उदा. नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळाप्रसंगी झालेली चेंगराचेंगरी.

५. प्रदुषण वाढ :- झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणमुळे कारखाने व उद्योग वाढले त्याबरोबर प्रदुषण वाढले.

६. जागतिक स्तरावर होत असलेले वातावरणातील बदल यामुळे नैसर्गिक आपत्ती मोठ्या प्रमाणावर येत आहे.

७. संपूर्ण जगाचे तापमान वाढल्याने उत्तर व दक्षिणेकडील बर्फ वितळून पाण्याच्या पातळीत वाढ होत आहे. त्यामहे जगबुडी या मोठ्या आपत्तीला सामोरे जाण्याची शक्यता वाटते.

८. मानवाच्या वर्तणुकीमुळे कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे व त्यामुळे ओझोन वायुच्या थराचा ऱ्हास होत आहे.

९. शहरीकरण, लोकसंख्यावाढ, त्यामुळे विविध प्रकल्पांची उभारणी केली जाते. त्यातून भ्रष्टाचार, जंगलतोड यामुळे मानवनिर्मित आपत्तींना सामोरे जावे लागते.

१०. नैसर्गिक आपत्तीला देखील मनुष्यच कारणीभूत आहे. उदा. मुंबई शहरातील मिठी नदीचा प्रवाह लुप्त झाला आहे. सपाटीकरण यामुळे पुर पसरण्यास मदत होते.

**आपत्तीचे प्रकार-**

नैसर्गिक आपत्ती

मानवनिर्मित आपत्ती

**नैसर्गिक आपत्ती-**

१. भूकंप

२. पूर

३. वादळे

४. त्सुनामी

५. दरडी कोसळणे / भूस्खलन

६. अतिवष्टी

७. हिमवादळे व हिमपात

८. मानवी अविचार, उतावळेपणा यातून ओढवलेली नैसर्गिक आपत्ती
९. नैसर्गिक रोगराई, साथीचे आजार
१०. जंगलातील वणवे
११. ज्वालामुखीचा उद्रेक
१२. उल्कापात
१३. प्रदेश ओसाड होणे

**मानवनिर्मित आपत्ती-**

मानवनिर्मित आपत्ती या अपघातातून सुरक्षिततेचे पुरेसे उपाय न योजल्याने होतात. त्यांचे स्वरूप गुंतागुंतीचे असते व त्यांची तीव्रता व व्याप्ती कमी अधिक प्रमाणात असते.

१. आग औद्योगिक क्षेत्रातील व अन्य प्रकारची.
२. रासायनिक व वायुगळती.
३. इमारत कोसळणे.
४. रेल्वे, हवाई, रस्ते व जलवाहतुकीतील अपघात.
५. अणुभट्टीतील किरणोत्सर्ग, जैविक संहार.
६. युध्दे - पारंपारिक व अपारंपारिक. परिक परिक
७. दहशतवाद व गुन्हेगारी वाढल्याने घडलेले बॉम्बस्फोट, अपहरण, खून यासारख्या आपत्ती.
८. पर्यावरण हासातून ओढवलेली संकटे.
९. माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित गुन्हेगारी आणि त्यातून उद्भवणारी संकटे.

**नैसर्गिक आपत्ती-**

मानवावर येणारी निसर्गनिर्मित संकटे म्हणजे नैसर्गिक आपत्ती. काही विशिष्टप्रकारच्या आपत्ती एखादया विशिष्ट प्रदेशात सतत येत असतात. त्या प्रदेशातीलमानवी जीवन दुर्धर होते. त्याचप्रमाणे काही नैसर्गिक आपत्ती विशिष्ट प्रदेशात विशिष्टकाळातच निर्माण होतात. म्हणून अशा आपत्तींचा अभ्यास करणे महत्वाचे तसेच गरजेचे आहे.

नैसर्गिक आपत्तीला कारणीभूत होणाऱ्या घटना अचानक व वेगाने घडून येत असतांना दिसल्या तरी त्याची निर्मितीप्रक्रिया सातत्याने, मंदगतीने घडून येत असते. जी दीर्घकालीन मंद प्रक्रिया दुर्लक्षित असते.

**मानवनिर्मित आपत्ती-**

मानवनिर्मित आपत्ती म्हणजे मानवाच्या चुकांमुळे त्यांच्यावर येणारी संकटे होत. ही आपली नैसर्गिक आपत्तीच्या तुलनेत हळुहळु उद्भवते. मानव आपत्तीस कारणीभूत ठरणारी परीस्थिती प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे निर्माण होते. बऱ्याचदा तिची पूर्वसूचनाही मिळते मात्र योग्य वेळी, योग्य पध्दतीने उपाययोजना न केल्यास परिस्थिती आटोक्याबाहेर जावून आपत्ती निर्माण होते.

उदा. दंगल नैसर्गिक आपत्तीपेक्षा मानवनिर्मित आपत्तीमुळे होणारी हानी तुलनेने कमी प्रमाणात व लवकर भरून काढता येणारी असते असे असले तरी काही वेळा प्रदुषणासारख्या मानवनिर्मित आपत्तीमुळे निसर्गचक्रावर विपरीत परिणाम होवून न भरून काढता येणारे नुकसान होवू शकते. म्हणूनच माननिर्मित आपत्ती निर्माणच न

होण्याची काळजी घेणे अधिक चांगले व आपल्या हातात आहे.

**विकास आणि आपत्ती-**

१. आपत्तीमुळे परिसराचा संपूर्ण विध्वंस होतो.

२. त्यानंतर मात्र परिसराची प्रगती अधिक वेगाने होते.

प्रगती

१. प्रगतीमुळे आपत्ती निर्माण होतात.

२. प्रगती जितकी जास्त तितकी संकटांची तीव्रता जास्त असते.

पूर्वीच्या काळी निर्माण होणारी संकटे ही बव्हंशी नैसर्गिक असत. मानवाची जसजशी प्रगती होऊ लागली, तंत्रज्ञानाचा विकास होऊन जसजशी त्याच्या राहणीमानात सुधारणा होऊ लागली, तसतशी संकटे वाढतच गेली. प्रगती करून घेण्यासाठी मानवाने निसर्गव्यवस्थेत जी ढवळाढवळ केली, त्याचाच हा परिणाम होता. निसर्ग आणि मानवसमाज अशा दोघांमुळे ही गुंतागुंत अधिकच वाढत गेली. कारण लोकसंख्येतील प्रचंड वाढ आणि प्रगती करून घेताना निसर्गाच्या मार्गात आणलेले अडथळे यांमुळे निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित अशी दुहेरी संकटे निर्माण झाली. इतकेच नव्हे तर या संकटांची भयानकता अधिकच वाढली. एक उदाहरण घेऊ, भूकंपाचा जबरदस्त हादरा ही नैसर्गिक घटना झाली. परंतु त्यामुळे जर मानवाने बांधलेले धरण फुटले तर त्यातून वाहणारा पाण्याचा प्रचंड लोंढा हा नदीच्या परिसरात जीवित आणि वित यांची अपरिमित हानी घडवतो. याच प्रकारे मानवाच्या विकासाच्या धडपडीत जर पर्यावरणाचा समतोल ढासळला तर पर्यावरणाचाही मोठी हानी होऊन त्याचे भौगोलिक परिस्थिती आणि मानवी जीवनावर अनिष्ट परिणाम होतात. पर्यावरणातील समतोल ढळल्यामुळे वातावरणात बदल घडतात. बर्फमय प्रदेशातला बर्फ वितळून समुद्राची पातळी वाढणे व त्यामुळेकाही बेटे व किनारपट्टया पाण्याखाली बुडणे, हाही त्यातलाच एक प्रकार.

लोकसंख्येची वाढलेली घनताही त्या प्रदेशाच्या परिस्थितीत बिघाड घडवायला कारणीभूत होते. एका ढोट्या प्रदेशात जर लोकसंख्या एकवटली, तेथे लोकांची प्रचंड गर्दी झाली तर तेथे धोक्याची तीव्रताही वाढते. भूकंप, नदयांना आलेले पूर यांमुळे घडणारी जीवितहानीही खूप मोठी असते. तुलनेने विरळ लोकवस्तीच्या प्रदेशात संकटाची तीव्रता कमी असते. संपूर्ण देशाचा विचार केल्यास दाट वस्तीच्या प्रदेशांना संकटांचा सामना अधिक करावा लागतो.

बेसुमार प्रमाणात होणारी बांधकामे संकटाचा धोका अधिक वाढवतात. वाढत्या नागरिकरणामुळे जंगले तोडली जातात. जमिनीला भार पेलवेल की नाही याचा विचार न करता जेथे जागा सापडेल तेथे बांधकामे केली जातात. कमकुवतअसलेल्या भूपृष्ठावर जर अशा प्रकारच्या बांधकामांची दाटी झाली तर कोणते संकट कधी ओढवेल त्याची कल्पनाच करता येत नाही. विशेषतः किनारपट्टीलगत जर अशी बांधकामे झाली तर भूकंप, पूर आणि वादळे यांसारख्या आपत्ती जेव्हा उद्भवतात, तेव्हा या नैसर्गिक आपत्तींना पूरक अशा मानवनिर्मित आपत्ती त्यानंतर ओढवतात. या परिसराचे झालेले बेसुमार नागरीकरण आणि अमर्याद औद्योगिकीकरण यांमुळे पर्यावरणाची प्रचंड हानी होऊन संकटाची भीषणता अधिकच वाढते. गंगेच्या खोऱ्यात प्रतिवर्षी नियमितपणे येणारे पूर व त्यामुळे होणारी जिवित व मालमत्ता यांची प्रचंड हानी या विधानाची साक्ष पटवतात.

या साऱ्या विवेचनावरून विकास आणि आपत्ती यांचा असणारा परस्परसंबंध स्पष्ट होतो. विकासापाठोपाठ आपत्तीचा धोका अधिकच वाढतो. त्यायोगे होणारी हानीही जास्त असते. मात्र त्याबरोबरच अशा वारंवार उद्भवणाऱ्या

संकटांची कारणे कोणती ? त्यांचे परिणाम कोणते होतात ? हेही लोकांच्या ध्यानात येते. त्यानुसार ते संकटांचा मुकाबला करू शकतात. प्रगतीमुळेच ज्या सोयीसुविधा निर्माण झाल्या, माहिती-तंत्रज्ञानाची जी प्रगती झाली, त्यायोगे संकटामधून बाहेर पडून लवकरात लवकर मानवी जीवन पूर्वपदाला येऊ शकते. संकटाच्या खुणाही शिल्लक राहत नाहीत. इतकेच नव्हे तर आपत्ती ही वरदान ठरून मानवाची अधिकच प्रगती होते. परिसराचा झपाट्याने विकास होतो. लातूर परिसरात जो प्रचंड भूकंप झाला, त्यामुळे अपरिमित हानी झाली हे जरी खरे असले तरीही त्यानंतरच त्या परिसराचा अधिक वेगाने विकास झाला हेही ध्यानात घ्यायला हवे.

**आपत्ती निवारणाचा आकृतिबंध-**

आपत्ती या ओढवणारच. त्या ओढवू नयेत यासाठी प्रत्येकानेच सावधगिरी घ्यायला हवी अन् ओढवल्याच तर त्यांचा प्रतिकार करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपत्ती याव्यात असे कुणालाच कधीही वाटत नाही. तथापि त्या ओढवल्याच तर त्यांची तीव्रता पध्दतशीरपणे कमी करता येते. आपत्ती या नियोजित नसतात परंतु योजनाबध्द प्रयत्नांनी त्यांचे निवारण होऊ शकते. आपत्ती निर्माण झाली की ती सौम्य करण्यासाठी प्रयत्नकरणे हे ओघानेच येते. एक गोष्ट घडली की तिची प्रतिक्रिया म्हणून दुसरी गोष्ट घडवावी लागतेच. संकटे ही आधी घडतात. त्यांची कारणे नैसर्गिक किंवा मानवनिर्मित असतात. त्यांच्या निवारण्यासाठी धडपड करणे ही प्रतिक्रियात्मक स्वरूपाची घटना आहे ते स्वाभाविकच घडते. तथापि त्या संदर्भात जर योजनाबध्द प्रयत्न केले, व्यवस्थित ठरवून सर्व गोष्टी केल्या तर त्यांचे फळ अधिक मिळते. साहजिकच व्यवस्थापनाच्या संदर्भातील तत्वज्ञान, त्याची कार्यपध्दती व नेतृत्वाकडून घेतले जाणारे योग्य प्रकारचे निर्णय व त्यांचे कार्यवाही या गोष्टी महत्वाच्या आहेत. याचाच अर्थ असा की शास्त्रशुध्द पायावर होणारे प्रयत्न, नेतृत्वाकडून अवलंबली जाणारी व्यूहरचना आणि व्यवस्थापनातील सुयोग्य तंत्राच्च वापर याद्वारे आपत्ती निवारणचे कार्य चांगल्या प्रकारे होऊन ते अधिक लाभदायक ठरले पर्यावरण सुरक्षित बनवण्याचे कार्यक्षेत्र या व्यवस्थापनात असते. जीविताची सुरक्षितता है त्याचे कार्य असते तर संकटावर मात करून टिकून राहण्याचे उद्दिष्ट त्यामध्ये साधते जाते. प्रत्येक देशाने, राष्ट्रांच्या समूहाने जेव्हा आपल्या अस्तित्वाचे उद्दिष्ट आपल्यासमो ठेवलेले असते, त्यावेळी तेथील जनता आणि शासनयंत्रणा यांना त्याबाबतीत दह राहण्याची आपली कर्तव्ये जबाबदारीने पार पाडण्याची भूमिका बजावावीच लागते. व्यवस्थापनशास्त्राच्या भाषेत असे झाले तरच आपत्ती निवारण हे उत्तम दर्जाचे होते. ते उपभोक्त्यांपर्यंत व्यवस्थित पोहोचते व उपभोक्ते (म्हणजेच देशातील जनता) त्याचा जास्तीत जास्त लाभ घेऊ शकतात.

जेव्हा आपण देशाच्या राज्यघटनेचा विचार करतो, तेव्हा प्रत्येक व्यक्तीला सुरक्षितता, जगण्याचा अधिकार व राष्ट्रीय एकात्मता या संदर्भात कटिबद्ध राहण्याची आपण घेतलेली शपथ त्यात नोंदवलेली आहे. प्रत्येकास आपले जीवित आणि मालमत्ता सुरक्षित राखण्याचा अधिकार घटनेनेच दिलेला आहे. तर त्यासंदर्भातील संरक्षण, शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी शासनाची आहे. घटनेमध्ये याबाबत विस्तृतपणाने लिहिलेले आहे. तसेच राष्ट्रीय एकात्मता आणि सुरक्षितता राखणे हे प्रत्येक व्यक्ती व संस्थेचे मूलभूत कर्तव्य असते, तर सरकारसाठी ते मार्गदर्शक तत्त्व आहे.साहजिकच आपत्ती निवारणाची जबाबदारी ही प्रत्येक व्यक्ती, संस्था आणि सरकार यांच्यावर आपोआपच येते.

आपत्ती व्यवस्थापन हे योजनाबद्ध रीतीने अमलात आणता येते, असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा आपत्ती यायच्या आधीच योग्य ती सावधगिरी बाळगणे, आपत्तीचा प्रतिकार करणे, तिच्यापासून लोकांना वाचवणे, आपत्तीची झळ कमी करणे अशा एका पाठोपाठ करायच्या गोष्टींचा विचार ओघानेच येतो. हे सर्व टप्पे आकृतीच्या

साहाय्याने याप्रमाणे मांडता येतील.

**आपत्ती व्यवस्थापनातील टप्पे-**

**आपत्तीपूर्व टप्पा -**

संकटाचा पूर्वअंदाज येणे

प्रतिकारासाठी सुयोग्य नियोजन करणे.

योजनानिर्मिती अंमलबजावणीसाठी योग्य यंत्रणा निर्माण करणे.

**आपत्ती दरम्यानचा टप्पा-**

योजनेची सुयोग्य अंमलबजावणी

**आपत्ती पश्चातचा टप्पा-**

अंमलबजावणीनंतर मूल्यमापन करणे.

त्याविषयी योग्य ती यंत्रणा निर्माण करून अहवाल घेणे.

पुनर्वसन करणे.

त्रुटी दूर करणे. प्रभावी अंमलबजावणी

आपत्ती निवारण ही कोणा एकाची जबाबदारी नसते. सरकार, शासन यंत्रणेतील सर्व घटक ? विविध व्यावसायिक, उद्योगपती, यांचे समुह/संघ, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, कुटुंबे आणि त्यातील प्रत्येक व्यक्ती अशा सर्वांनीच आपत्ती निवारणाच्या व्यवस्थापनात सहभागी होणे गरजेचे असते. कोणती ना कोणती जबाबदारी ही घ्यावीच लागते. सर्वांना कार्यपद्धतीचे हे टप्पे अवलंबावे लागतात.

आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात अ) आपत्तीपूर्वीची अवस्था, ब) आपत्तीच्या दरम्यानची कार्यपद्धती अवस्था व क) आपत्तीनंतरची अवस्था अशा तीन अवस्था असतात. या प्रत्येक अवस्थेसाठी स्वतंत्र धोरण ठरवून त्यानुसार कार्यक्रम तयार करून ते प्रभावीरित्या अमलात आणावे लागतात. तरच एका अवस्थेमधून पुढच्या अवस्थेत कोणत्याही अडचणी निर्माण न होता जाणे शक्य होते. मात्र बऱ्याच वेळेला हा क्रम आणि त्याचा कालावधी निश्चित नसतो.

**व्यवस्थापनाविषयी विविध तज्ञांनी केलेल्या व्याख्या**

हेन्री फेयाल यांच्या मते व्यवस्थापन म्हणजे भविष्याबद्दलचा अंदाज बांधणे, नियोजन करणे, संघटना उभारणे, आदेश देणे व त्यांचे समन्वय साधून नियंत्रण ठेवणे.जॉर्ज टेरी यांच्या मते पर्वनिर्धारित उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी व्यक्ती व साधन सामग्रीचा उपयोग करून नियोजन करणे. संघटना निर्माण करणे, प्रोत्साहन देणे तसेच समुहान्या कार्यावर नियंत्रण करणे इत्यादी क्रियांचा समावेश असलेली प्रक्रिया म्हणजे व्यवस्थापन होय.

जेम्स ल्युंडी -यांच्या ते विशिष्ट उद्देशंच्या पूर्तीसाठी इतरांनी चालविलेल्या प्रयत्नांचे नियोजन करणे त्यात समन्वय साधणे, प्रेरणा निर्माण करणे आणि नियंत्रण ठेवणे इत्यादीसाठी करावे लागणारे मुख्य कार्य म्हणजे व्यवस्थापन होय.

व्यवस्थापन क्षेत्रातील या विविध तज्ज्ञांनी केलेल्या विविध व्याख्या विचारात घेता सारांश रूपाने असे म्हणता येईल. नियोजन, संघटन, कर्मचारी नियुक्ती, दिशादर्शन, समन्वयीकरण, नियंत्रण, प्रोत्साहीकरण, संप्रेषण (संवाद) यांसारख्या अनेक कार्याचा व्यवस्थाप या संकल्पनेत समावेश होतो. या प्रत्येक कार्याला वेगळे अस्तित्व

आणि स्वतंत्र महत्व आहे. तथापि अपेक्षित परिणाम मिळविण्यास ही सर्व कार्ये एकाच वेळी मितव्ययीरित्या (अनावश्यक खर्च टाळून) व कार्यक्षमतेने पार पाडावी लागतात.

या व्याख्यांमध्ये म्हटल्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापनात भविष्यात येणाऱ्या आपत्तीच्या निवारणार्थ काही उद्दिष्टे निश्चित करण्यात यावीत. येणाऱ्या वेगवेगळ्या आपत्तींचा अंदाज बांधण्यात यावा यामध्ये स्थळ, काळ सापेक्ष आपत्तींच्या विविध कारणांची पडताळणी करून त्यातील आपल्याशी संबंधीत उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्तींचा विचारपूर्वक अंदाज बांधण्यात यावा. या संभाव्य आपत्ती लक्षात घेऊन त्या टाळण्यासाठी आणि अटळ असलेल्या आपत्ती आल्यास योग्य मार्गाने निवारण करण्यासाठी उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने नियोजन केले जावे. या नियोजनामध्ये संघटना निर्मा करण्यात शासकीय पातळीवरील निमशासकीय पातळीवरील, ग्रामस्तरावरील, स्वयंसेवी संघटना, वैयक्तिक स्वंयसेवक या सर्व मनुष्यबळाची व संशोधनाची आपत्तींच्या निवारणार्थ उभारणी करण्यात यावी. या कार्यात त्यांना प्रोत्साहन कसे मिळेल यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, या सर्वांच्या कार्यावर आदेश देण्याची व्यवस्था अतिशय शिस्तबध्द व अचूक अशी असावी, यामध्ये अधिकाराचे स्तर पाडून त्यांच्यावर विशिष्टजबाबदारी सोपवलेली असावी. चालवलेल्या या सर्व व्यवस्थापकीय कार्याचा समन्वय साधून त्यावर मध्यवर्ती स्वरूपाची सर्वोच्च नियंत्रण यंत्रणा असावी जेणेकरून ती विभागीय यंत्रणांवर देखरेख ठेवून त्यांच्यात समन्वय राखण्याचा प्रयत्न करील. या सर्व एकूणच आपत्ती व्यवस्थापन असे म्हणता येईल.

व्यवस्थापन शास्त्रानुसार विविध प्रकारच्या आपत्ती विचारात घेऊन नियोजनाद्वारे भविष्यात करावयाच्या कृतींची आखणी करून ध्येय, धोरणे, कृती कार्यक्रम व त्याची पध्दती इ. ठरविण्यात आलेली ध्येये साध्य करण्यासाठी उपलब्ध भौतिक, आर्थिक व मानवी संसाधनामधून सुयोग्य निवड करून त्यानुसार प्रत्येक पातळीवर कोणती कृती करावयावी याचे संघटन केले जाते. यासाठी पातळीबध्द व औपचारिक आणि प्रत्येक पातळीवरील कर्मचाऱ्यांची योग्य ठिकाणी व योग्य वेळी नियुक्ती करावी लागते. अपेक्षित ध्येये किमान खर्चात व किमान कष्टाने साध्य करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या नेतृत्व गुणांना बाव देवून प्रोत्साहन दिले जाते. त्याचप्रमाणे वेळोवेळी सूचना देणे, मार्गदर्शन करणे, समुपदेशन व देखरेख करणे आणि एकूणच सर्व कार्याचे मूल्यमापन करणे या क्रियांचाही यात समावेश होतो.

आपत्ती व्यवस्थापनात नियोजनपूर्वक ठरविलेल्या ध्येयाप्रत जाण्यासाठी सहस्थितीतील कार्याचे मूल्यमापन करून त्यानूसार पुढील कार्याची व कृतींची गती नियंत्रणाद्वारे कमी-जास्त केली जाते. शासनाच्या प्रशासकीय पातळीवर आपत्ती आपली निवारणार्थ ध्येय धोरणे ठरवून, ती साध्य करण्यासाठी धोरणात्मक बाबींवर निर्णय घ्यावे लागतात. या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी आर्थिक तरतूद करावी लागते. सत्ता व अधिकार पातळीचे विकेंद्रीकरण करून संरचना ठरवावी लागते. एकूणच चालणाया व्यवस्थापनावर प्रशासनास नियंत्रण ठेवावे लागते. एकूणच चालणाया व्यवस्थापनावर प्रशासनास नियंत्रण ठेवावे लागते. आपत्ती निवारणार्थ चालणारे व्यवस्थापन प्रशासनाला उत्तरदायी असते. व्यवस्थापकीय त्रुटीबददल प्रशासन व्यवस्थापनाकडून स्पष्टीकरण मागु शकते. व गंभीर त्रुटीबद्दल ते व्यवस्थापनास जाब विचारून कारवाई करू शकते. या ठिकाणी प्रशासकीय सेवेतील थोर विद्वान डॉ. पदमाकर दूभाषी यांनी व्यक्त केलेले विचार कार्यरत असणाया विविध स्तरावरील सेवकांनी कतीत आणले तर एक आदर्श व्यवस्थापन प्रणाली उभी राहू शकते.